जबाब दिनांक १७/११/२०२६

श्रीमती रोहिणी टारजेन खल्को, वय ४६ वर्षे, काम- शिक्षिका, रा.ठी.- रेल्वे ब्लॉक-४, बि.नं.-१, फ्लॅट नं.७, तिसरा मजला, रेल्वे ऑफीसर्स क्वार्टर्स, माझगाव, भायखळा-पूर्व, मुंबई ४०००१०. मोनं. -९८१९०८६६८२, आधार कार्ड क्र.९७८६ २९३७ ९८४५.

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर सन २०१९ पासून राहवयास आहे. माझ्या सोबत माझे पती नामे टारजेन, वय ५४ वर्षे, दोन मुले नामे बेनेडिक्ट, वय २२ वर्षे, मुलगी नामे रबेका, वय १९ वर्षे असे एकत्र रहावयास आहेत. माझे पती टारजेन हे सेंट्रल रेल्वे मुख्यालय, सी.एस.टी., मुंबई येथे एक्झेक्युटीव्ह इंजिनिअर या पदावर नोकरी करीत आहेत. मी राहते घरी मुलांचे क्लासेस घेते. त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर आमचा उदरनिर्वाह चालतो आहे.

यापूर्वी सन २०१४ पासून ते सन २०२० पर्यंत रोहिणी ट्युटोरिअल्स या नावाने क्लेअर रोड, भायखळा-पश्चिम, मुंबई येथे क्लास चालवित होते. सदर क्लास मध्ये ११ शिक्षक होते. त्यापैकी शिक्षक नामे रामानंद साह, वय ४३ वर्षे, रा.ठी.- खारघर, मुंबई हे माझेकडे सन २०१४ पासून नोकरीस होते. त्यानंतर सन २०२० पासून कोरोना मुळे माझा क्लास बंद झाला. सन २०२२ मध्ये शिक्षक नामे रामानंद साह यांनी मला संपर्क करून ते पैसे गुंतवित असलेल्या डी.जी.सी.एक्स., मलेशिया ही कंपनी फोरेक्स आणि क्रिप्टो मध्ये ट्रेडिंग करते, मी या कंपनीमध्ये पैशांची गुंतवणूक केल्यास मला ४ टक्के नफा मिळेल असे सांगितले. त्यानंतर माहे जानेवारी-२०२३ मध्ये मी ५,००,०००/- रू रोख रक्कम रामानंद साह यांचे सांगणेवरून त्यास दिले. तेव्हा त्याने मला मोबाईल मध्ये सदर कंपनीचे ॲप्लिकेशन इंस्टोल करून दिले. त्यामध्ये माझी ५५५५/- यु.एस.डी.टी. जमा झाली आणि दर महिन्याला ४ टक्के नफा यु.एस.डि. टी. मध्ये जमा होत असतांना दिसत होते. सदरचे नफा मी एक ते दोन वेळा काढले असतील, तेव्हा रामानंद साह यांनी मला रोख रक्कम आणून दिली. तेव्हा पासून रामानंद साह याचेवर माझा विश्वास बसला होता.

त्यानंतर सन २०२३ मध्ये रामानंद साह याने फोन द्वारे मला रशियन कंपनी XPO.ru यामध्ये गुंतवणूक केल्यास दरमहा ८ ते १० टक्के नफा मिळणार असल्याचे सांगितले. त्याचेवर विश्वास ठेवून दिनांक ०५/१०/२०२३ रोजी माझ्या बँक ऑफ बडोदा खाते क्र.०३८८०१०००१३२१२ यामधून १,००,०००/- रू हे रामानंद साह यास त्याचे मोनं.- ९२६२३७२३३३ यावर गुगल पे द्वारे पाठविले. तेव्हा मला गुगल प्ले स्टोअर मधून XPO.ru या नावाचा ॲप्लीकेशन डाऊनलोड करण्यास सांगितले.

माहे जानेवारी-२०२४ मध्ये माझे नातेवाईक हे छत्तीसगढ येथून माझी मुले हे आमच्या ख्रिश्चन धर्माचा संस्कार घेणार असल्याने माझे घरी आले होते. तेव्हा रामानंद साह याने माझे घरी येवून आम्हा सर्वांना XPO.ru या रशियन कंपनी मध्ये गुंतवणूक करण्याचे फायदे सांगितले आणि आम्हाला सदर कंपनीमध्ये गुंतवणूक करण्यास उद्युक्त केले. तेव्हा माझे घरच्यांपैकी एकूण १५ जणांनी छोटी-मोठी रक्कम मिळून ५,००,०००/- रू रामानंद साह यांचेकड गुंतविले होते.

दिनांक ०७/०३/२०२४ रोजी होटेल थ्री स्टार, खारघर, नवी मुंबई येथे जयपूर येथून सुनिल अग्रवाल, ब्रिजेश पांडे हे आले होते, आणि त्यांनी सदर मिटींगमध्ये XPO.ru या रशियन कंपनीचे कामाकाजाबाबत प्रोजेक्टर लावून कंपनीचे इंडेक्स मॅनेजर, ट्रेडींग कशी होते, फॉरेक्स आणि क्रिप्टो मध्ये ट्रेडिंग कशी करतात, त्या मधून रिटर्न्स कसे मिळतात, याबाबत माहिती दिली त्याबबरोबर सुनिल अग्रवाल याने सांगितले की, त्याची मुलगी रशियामध्ये एम.बी.बी.एस. करते आहे, सदरची कंपनी ही रशियामध्ये आहे, आणि त्याने सदर रशियामध्ये राहून सदर कंपनीला भेट दिली आहे. सदर कंपनीमुळे आमच्या वारसांना किती फायदा होणार आहे, याची माहिती दिली. सदर मिटींगला अंदाजे १०० जण हजर होते. त्यावेळी मी सुनिल अग्रवाल यांना काही प्रश्न विचारले होते. तेव्हा त्यांनी माझे प्रश्नाची उत्तरे दिली व सांगितले की, तुम्ही यामध्ये तुमच्या जवळच्या लोकांना गुंतवणूक करण्यास सांगणार, तर तुम्हाला रेफरन्स बेनिफिट्स देखील मिळणार असे सांगितले. त्यानंतर सुनिल अग्रवाल हे माझ्या संपर्कात आले. तेव्हा सुनिल अग्रवाल हे सदर कंपनीमध्ये मोठया पदावर काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर दिनांक २५/०५/२०२४ रोजी रामानंद साह यांनी खारघर, नवी मुंबई येथे एका हॉल मध्ये (जाव माहिती नाही) आयोजित करण्यात केली होती, सदर मिटींग पुर्वी सुनिल अग्रवाल यांनी मला फोनद्वारे माझेकडून २० लोकांना मिटींगला आणण्यास सांगितले होते. परंतु, मी माझे कडे शिकणाऱ्या मुलांचे पालक नामे परवेझ अन्सारी, त्याचा मुलगा, मिना सिंघल, तिचा पती अनिल सिंघल यांना घेवून मिटींगकरीता हजर झाले. त्यावेळी सुनिल अग्रवाल याने मला खाजगी मध्ये बोलावून घेवून त्याने मला रामानंद साह याच्या मदतीने मुंबईचा कार्यभार सांभाळण्याबाबत, आणखी गुंतवणूक दार वाढविण्यास सांगितले, जेणेकरून आम्हाला रेफरल इन्कम मिळेल.असे सांगितले.

त्यानंतर माहे मे-२०२४ पर्यंत मी मुंबई व छत्तीसगढ मध्ये लोकांना भेटून त्यांना XPO कंपनीचे महत्व समजावून सांगून त्यांना कंपनीमध्ये गुंतवणूक करण्यास सांगत होती, असे करून त्यानंतर माझे संपर्कातून २१ जण गुंतवणूकदार तयार झाले. त्यांची नावे १) रजनी तिरके (छत्तीसगढ) मोनं.- ६२६०३७०२४३, २) रितिका तिरके (छत्तीसगढ) , मोनं.-९६३००४४४०८, ३) रविना तिरके (छत्तीसगढ), मोनं.-७४१५८६७७२२,४) अल्फ्रेड लुईस (छत्तीसगढ), मोनं.-८३०५३२६६६८, ५) मिना सिंघल (मुंबई), मोनं.-९८७१३७५०२२, ६) नेकलेस खल्को(छत्तीसगढ), मोनं.- ७९९९५९६४७६५ ,७) निकेत खल्को (छत्तीसगढ), मोनं.- ७९९९५६४७६५ ८) निकीता खल्को (छत्तीसगढ), मोनं.- ७९९९५६४७६५ ९) परवेझ अन्सारी (मुंबई), मोनं.- ९९२०८४३४३२, १०) हरित मिंज (छत्तीसगढ), मोनं.-७०२४५४१६९६, ११) निहार मिंज (छत्तीसगढ), मोनं. -७०२४५४१६९६, १२) प्रियंका लकडा (छत्तीसगढ), मोनं.-८३०५९८६८८८, १३) रेणुका कुमार (मुंबई), मोनं- ९९८७६६४४६२, १४) शैला सोनावणे (मुंबई), मोनं.-९३७२३७९२३७, १५) माला मिंज(छत्तीसगढ), मोनं.- ७०२४५४१६९६, १६) यश तिरके (छत्तीसगढ), मोनं.- ६२६०३७०२४३, १७) निर्मला लुईझ(छत्तीसगढ), मोनं.- ९९८१०६२२५८, १८) जेनेट लुईस(छत्तीसगढ), मोनं.- ८३१९४०९००५, १९) रविना सिंग (मुंबई ), मोनं.-८८५०८३१५७२ व इतर दोन जणांची नावे लक्षात नाहीत. तेव्हा मी त्यांचेकडून ऑनलाईन व रोखीने पैसे घेवून असे अंदाजे एकूण १५,००,०००/- रू रोख रक्कम मी रामानंद साह यांना दिले आहेत. त्यानंतर गुंतवणूकदारांनी स्वत: XPO कंपनीचे ॲप्लीकेशन डाउनलोड करून घेतले.

माहे ऑगस्ट-२०२४ मध्ये संपुर्ण भारतातून १०,०००/- युएसडीटी पेक्षा जास्त गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांना मोफत क्वालालंपूर, मलेशिया येथे मिटींगकरीता घेवून गेले होते. सदर मिटींगला रामानंद साह, त्यांची बहीण, आणि त्यांचे मित्र असे व भारतातील इतर गुंतवणूकदार हे मिटींगला गेले होते. तेव्हा मी रामानंद साह यांना मिटींगचे व्हिडीओ बनवून मला दाखविण्यास सांगितले होते. सदर मिटींगला रजत शर्मा, विजय मौर्या, ईश्वर वर्मा, सुरेंद्र सैनी, सुरेंद्र बरवर, सुनिल पाटील हे हजर होते. तेव्हा रामानंद साह याने मला मिटींगचा व्हिडीओ दाखविला असता, त्यात प्रोजेक्टरवर झुम मिटींगद्वारे हरि पुरूषोत्तम नावाचा इसम हा स्वत:ला व्हाईस प्रेसिडेंट, जे.पी.मॉर्गन, सिंगापूर असे सांगून त्यावी बँक ही XPO.ru या रशियन कंपनीची ऑडीट करीत असल्याचे सांगितलेवरून माझा त्यांचेवर विश्वास बसला. त्यावेळी रामानंद साह याची रजत शर्मा याचेशी भेट झाली, आणि तेव्हापासून रजत शर्मा हा रामानंद साह व त्यांचे गुंतवणूकदारांच्या संपर्कात आला. त्यानंतर माहे सप्टेंबर-२०२४ पासून रजत शर्मा हा रामानंद साह व त्यांच्या गुंतवणूकदारांचे झुम मिटींग घेत होता. त्या मिटींगला मी देखील हजर होते. तेव्हा रजत शर्मा याने कोणाला काही शंका असल्यास विचारण्यास सांगितले त्यावेळी मी शंका विचारल्यानंतर रजत शर्मा याने माझे कौतुक केले होते.

माहे ऑक्टोंबर-२०२४ मध्ये ज्या गुंतवणूकदारांचे १०,०००/- युएसडीटी पेक्षा जास्त गुंतवणूक होती, त्यांना दुबईमध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे मोठा मनी एक्सपो शो होणार होता, त्यासाठी बोलावून घेतले

होते. तोपर्यंत रामानंद साह हे सदर XPO.ru या रशियन कंपनीची कंपनीचे इलाईट मेंबर बनलेले होते. त्यांना रजत शर्मा यांनी मला काहीही करून दुबईला आणण्यास सांगितले. त्या ठिकाणी मी गेल्यावर तेथे रशियन कंपन्याचे स्टॉल लागले होते. तेथे संध्याकाळी ०४.०० वा ग्रॅण्ड हयात, दुबई मध्ये रजत शर्मा याने ५०० भारतीयांसाठी एक प्रोग्रामचे आयोजन केले होते. त्याठिकाणी कंपनीचे इलाईट मेंबर्स ज्यांनी त्यांच्या मार्फतीने जास्त गुंतवणूकदार जमवून त्यांचेकडून जास्त प्रमाणात पैसा हा कंपनीमध्ये गुंतविला आहे. त्यांचा सत्कार करण्यात आला होता. त्याठिकाणी रजत शर्मा हा मला भेटण्यासाठी मागच्या बाजुला आला होता. तेव्हा त्याने मला मुंबईच्या लोकांसाठी झुम मिटींग घेण्यास सांगितले. तेव्हा पासून तो माझे संपर्कात आला होता. सदर ठिकाणी XPO.ru या रशियन कंपनीची माहिती घेतल्यानंतर मला या कंपनीवर अधिक विश्वास बसला, आणि मुंबईला परतल्यावर मी ७,००,०००/- रू रोख रक्कम रामानंद साह यांना दिले, आणि माझे १०,०००/- यु.एस.डि.टी. डॉलरचे वाढलेला नफा, तसेच रेफरल इन्कम मिळून ३,००,०००/- रू जमा झाले होते. असे एकूण मिळून माझी सदर XPO.ru या रशियन कंपनीमध्ये १०,००,०००/- रू ची गुंतवणूक झाली होती.

त्यानंतर रजत शर्मा याने रामानंद साह यास त्याचे ज्या-ज्या ठिकाणी गुंतवणूकदार आहेत, त्यांच्यासाठी रजत शर्माचे सहकारी सेमिनार घेणार असल्याचे सांगितले. तेव्हा माझे नातेवाईक असलेल्या छत्तीसगढ या ठिकाणी दिनांक ०८/१२/२०२४ रोजी रजत शर्मा याने स्वतः जावून सेमिनार घेतला. सदर सेमिनार मध्ये रजत शर्मा, विजय मौर्या, रामानंद साह, मी आणि इतर गुंतवणूकदार हजर होते. त्या सेमिनार मध्ये रजत शर्माचे इंटरव्हयू घेण्यासाठी मला सांगण्यात आले म्हणून मी रजत शर्माचा इंटरव्हयू घेतला. त्यावेळी मी रजत शर्माला विचारले की, XPO क्यो नही भाग सकती है? हा प्रश्न विचारला असता, तेथे हजर असलेला विजय मौर्या याने सांगितले की, अगर ऐसा हुआ, तो उसकी जिम्मेदारी मे लेता हूँ, आपका पुरा पैसा मे वापस करूंगा.

माहे मार्च-२०२५ मध्ये माझे डी.जी.सी.एक्स., मलेशिया या कंपनीच्या ॲप्लीकेशनमध्ये ५,९५५/- यु.एस.डी.टी. चे १६,६६५/- यु.एस.डी.टी.डॉलर (भारतीय चलनामध्ये १४९९८५०/- रू) जमा झाले. सदरचे युएसडीटी डॉलर हे रामानंद साह यांच्या मदतीने मी XPO ॲप्लीकेशनमध्ये पाठविले. सदर महिन्यामध्ये XPO ॲप्लीकेशनमध्ये माझ्या गुंतवणूकीवरील नफा, रेफरल इंन्कम मिळून २६,००,०००/- रू जमा झाले होते.

माहे एप्रिल-२०२५ पर्यंत माझे मार्फतीने एकूण ५०० हून अधिक गुंतवणूकदार तयार झाले. त्यांनी देखील स्वतः XPO.ru हे ॲप्लीकेशन डाउनलोड करून घेवून त्यामध्ये गुंतवणूक करण्याची पध्दत शिकून घेवून त्यानंतर त्यांनी स्वतः यु.एस.डी.टी. डॉलर मध्ये गुंतवणूक करण्यास सुरुवात केली, परंतु, ते माझ्या रेफरन्समधून कंपनीला जोडले गेले असल्याने मला त्यांचे कमिशन मिळत होते. त्यामध्ये जर टिम लिडर कडून १,००,००,०००/- रू वा बिझनेस कंपनीला मिळत असेल, तर टिम लिडरला त्याचा एक टक्का कमिशन मिळणार, असे करून मला देखील एक टक्का कमिशन मिळण्यास सुरुवात झाली होती. माझेकडून कंपनीला ५०० हून जास्त गुंतवणूकदार व १,००,००,०००/- रू हून अधिक गुंतवणूक मिळाल्याने मला दिनांक १८/०४/२०२५ रोजी इलाईट मेंबर बनविल्याचे रामानंद साह यांनी सांगितले.

त्यानंतर रजत शर्मा हा डायरेक्ट मला संपर्क करु लागला. माहे मे-२०२५ पासून रजत शर्मा हा माझ्या गुंतवणूकदारांची झुम मिटींग घ्यायचा, त्यांना तो खुप मोठे नफा होणार आहे, असे दाखवायचा, आणि आणखी जास्त गुंतवूणकदारांना आणून दिल्यास कमिशन द्यायचे प्रलोभन दाखवायचा. सदरचा प्लॅटफॉर्म हा आम्ही करणार आणि आमची मुलेही करणार, त्याचा फायदा आमच्या मुलांना होणार आहे असे सांगायचा. तेव्हापासून माझे गुंतवणूकदारांनी अचानक पणे त्यांच्या संपर्कातील लोकांना कंपनीशी जोडण्यास सुरुवात केली.

सदरची गुंतवणूकीची पध्दती अशी होती की, गुंतवणूकदार हे त्यांचेकडील रोख रक्कम हे त्यांच्या टिम लीडर कडे जमा करतात, सदरचे टिम लीडर हे त्यांचेकडील जमा रक्कम घेवून त्यांचेवरील इलाईट मेंबर्स यांचेकडे जमा करतात, त्यानंतर इलाईट मेंबर्स हे सदरचे पैसे घेवून प्राईम ईलाईट मेंबर कडे जावून पैसे सोपवितात, तेव्हा प्राईम ईलाईट मेंबर हे संबंधित ईलाईट मेंबर्सच्या किंवा टिम लिडरच्या क्रिप्टो वॉलेट मध्ये यु.एस.डी.टी. ट्रांस्फर करतात, व ते ईलाईट मेंबर किंवा टिम लिडर हे सदरचे युएसडीटी संबंधित गुंतवणूकदारांच्या एक्सपीओ च्या ॲप मध्ये ट्रांस्फर करतात, कधी- कधी स्वतः टिम लीडर हे प्राईम ईलाईट मेंबर कडे जावून व्यवहार करून स्वतः युएसडीटी गुंतवणूकदारांना ट्रांस्फर करतात, तर कधी टिम लिडर च्या टिम मधील गुंतवणूकदार हे एकमेंकाशी रोखीने व्यवहार करून एकमेकांना युएसडीटी डॉलर ट्रांस्फर करतात. त्याचबरोबर एखादा गुंतवणूकदार हा ऑनलाईन पैसे ईलाईट मेंबरना पैसे ट्रांस्फर करायचे, त्यानंतर ईलाईट मेंबरकडे यु.एस.डी.टी. असतील तर ते स्वतः त्यांच्या एक्सपीओ च्या ॲप मधून संबंधित गुंतवणूकदाराला डॉलर ट्रांस्फर करायचे किंवा जर नसतील तर अन्य गुंतवणूकदाराला रोखीने अथवा ऑनलाईन पैसे देवून त्यास डॉलर संबंधित गुंतवणूकदाराला पाठविण्यास सांगत असे.

सदर एक्सपीओ कंपनीमध्ये डायरेक्टर रजत शर्मा, विजय मौर्या, ईश्वर वर्मा, ब्रिजेश पांडे, सुनिल अग्रवाल, असे होते, त्यांच्या हाताखाली प्राईम ईलाईट मेंबर होते, त्यांच्या हाताखाली ईलाईट मेंबर, ईलाईट मेंबरच्या खाली त्यांनी तयार केलेले टिम लिडर, टिम लिडर च्या हाताखाली तयार केलेले गुंतवणूकदार, सदर गुंतवणूकदारांमधून देखील एखाद्याने जास्तीत जास्त गुंतवणूकदार जमा केल्यास ते देखील ईलाईट मेंबर बनतात. अशाप्रकारे गुंतवणूकीचे चक्र वाढत जाते.

माहे जुलै-२०२५ मध्ये रजत शर्मा याचा राजस्थान, जयपूर येथे वाढदिवस साजरा करण्यासाठी रामानंद साहची टिम, परवेझ अन्सारी, सुरभी श्रिवास्तव, अल्फ्रेड लुईझ, शिल्पा गुप्ता असे गेले होते. तेव्हा सदरची गुंतवणूकदार हे मला डावलून रजत शर्मासोबत जोडले गेले. त्यावेळी रजत शर्मा ने सांगितले की, पुढच्या वेळी सप्टेंबर-२०२५ मध्ये तो थायलंडला सेलिब्रेशन ठेवणार असून त्यासाठी सर्वांनी १०,०००/- युएसडीटी डॉलर गुंतवणूक करण्यास सुरुवात करा. असे सांगितले. त्याचबरोबर इलाईट मेंबर्सनी पहिले १०,०००/- युएसडीटी डॉलर गुंतवूणक करावी असे सांगितले. तेथे सगळ्यासाठी लकी ड्रॉ ठेवण्यात येईल. त्यानंतर दिनांक ०८/०९/२०२५ रोजी १०,०००/- युएसडीटी जमा केलेल्या पात्र गुंतवणूकदारांना सेलिब्रेशनला थायलंड येथे घेवून आण्याचा खर्च इलाईट मेंबर्सनी करावा,असे रजत शर्मा याने सांगितलेवरुन मी २५ पात्र गुंतवणूकदारांना थायलंडला नेण्याचा खर्च हा प्रत्येकी ५५,०००/- रू असे एकूण १३,७५,०००/- रू खर्च केला होता. दिनांक ११/०९/२०२५ रोजी पटाया, थायलंडमध्ये रजत शर्मा द्वारा एक कार्यक्रम आयोजित केला होता, त्यामध्ये लकी ड्रॉ करून गुंतवणूकदारांना ४ स्कॉर्पिया एन कार, ४ महिंद्रा एक्स यु व्ही, १० रॉयल इन्फिल्ड मो/सायकल, २० ॲपल मॅकबुक , ६० सॅमसंग स्मार्ट वॉच गिफ्ट दिले. तेव्हा माझी नणंद रजनी तिरके हिला स्कोर्पियो एन ही मोटार कार लकी ड्रॉ मध्ये लागली. सदर कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी रजन शर्मा याने मला कंपनीच्या मोठया नेतृत्व करणाऱ्या इसमांचे मुलाखत घेण्यास सांगितले. तसेच त्या ठिकाणी एशिया पॅसिफिक हेड एक्सपीओ मार्केट असे पद सांगून एका इसम श्री.विवेन प्रसर्ट या इसमास दाखवून ओळख करून देण्यात आली. त्याच मंचावरुन रजन शर्मा याने पुढील ट्रीप ही अजरबाईजान, युरोप येथे काढणार असल्याचे सांगितले त्यासाठी पुन्हा १०,०००/- यु.एस.डी.टी. डॉलर जमा करण्यास आणि ईलाईट मेंबरने पहिले १०,०००/- यु.एस.डी.टी. जमा करावे, तसेच जे पात्र गुंतवणूकदार असतील त्यांना सदर ठिकाणी आणण्याचा खर्च करण्यास सांगितले. तेथून मुंबईत आल्यानंतर रजन शर्माने माझ्या क्रिप्टो वॉलेट मध्ये मोटार कार खरेदी करण्यासाठी त्याच्या वॉलेट मधून २३४००/- यु.एस.डी.टी. डॉलर पाठविले.

माहे ऑक्टोबर-२०२५ मध्ये रजत शर्मा यांनी सांगितले की, त्यांच्या एक्सपीओ कंपनीचे १) श्री. विवेन प्रसर्ट, एशिआ पॅसिफिक हेड, एक्सपीओ मार्केट, २) श्री.मार्कस श्नेदर, हेड ऑफ ब्रोकरेज ऑपरेशन, एक्सपीओ मार्केट, ३) श्री.तोबियास वेबर, हि.पी.फॉरेक्स ऑपरेशन, एक्सपीओ मार्केट, हे

भारतातील गुंतवणूकदारासोबत झुम मिटींग घेणार आहेत. तेव्हा त्यांनी , संपुर्ण भारतात ४,५०,०००/- गुंतवणूकदार असून त्यांना इंग्रजी येत नाही, तर तुम्ही झुम मिटींगमध्ये वरील तीन इसमांची मुलाखत घ्या आणि ते गेल्यावर सर्वांना हिंदीमध्ये समजावून सांगितले. त्यानुसार दिनांक ११/१०/२०२५ रोजी रात्री ०८.०० वा. झुम मिटींगमध्ये मी एक्सपीओ कंपनीचे १) श्री.विवेन प्रसर्ट, एशिआ पॅसिफिक हेड, एक्सपीओ मार्केट, २) श्री.मार्कस श्नेदर, हेड ऑफ ब्रोकरेज ऑपरेशन, एक्सपीओ मार्केट, ३) श्री. तोबियास वेबर, व्हि.पी.फॉरेक्स ऑपरेशन, एक्सपीओ मार्केट, यांची मुलाखत घेतली आणि त्यानंतर त्यांचे हिंदी भाषेमध्ये लोकांना समजावून सांगितले. त्या दिवसापर्यंत माझा एक्सपीओ मध्ये एकूण रक्कम ५०,००,०००/- रू जमा झाले होते.

दिनांक १६/११/२०२५ रोजी ईश्वर वर्मा याने एक्सपीओ च्या कामासाठी बँगलोर येथे जावून गुंतवणूकदारांना हिंदी भाषा येत नाही , इंग्रजी येते म्हणून त्यांनी मला त्यांना इग्रजीमध्ये समाजवून त्यांचा सेमिनार घेण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे माझे सोबत रामानंद साह, अनिल पाटील, सुनिल पाटील व मी असे आम्ही तेथे जावून सेमिनार घेतला. दिनांक १८/११/२०२५ रोजी बंगलोर मध्ये असतांना, रात्री मला रामानंद साह, आणि सुनिल पाटील यांचेकडून माहिती मिळाली की, भरतपूर, राजस्थान मध्ये एक्सपीओ चे ५ गुंतवणूकदारांना अटक झाली आहे. तेव्हा आम्ही दिनांक १९/११/२०२५ रोजी सुनिल पाटीलच्या रूममध्ये आम्ही चिंताग्रस्त होवून बसलो होतो, तेव्हा रजत शर्माने रामानंद साह ला 'तुम्ही सगळ्यांनी थायलंडला निघून या, मला तुमच्याशी काही बोलायचे आहे' असा मॅसेज केला. त्याप्रमाणे दिनांक २०/११/२०२५ रोजी आम्ही व इतर ४० इलाईट मेंबर्स हे फ्लाईटने थायलंडला पोहोचले. तेथे गेल्यावर मला समजले की, सु मोटो ने एक्सपीओ वर कारवाई करण्यात आली आहे. परंतु, तेथे आम्हाला रजत शर्मा हा भेटलाच नाही. आणि रजन शर्माने व्हिडीओ कॉलद्वारे तो दुबईला असल्याचे सांगून, कोणीही घरी जावू नका, पोलीस घरातून उचलून अटक करीत आहेत असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही सर्व थायलंडलाच स्वखर्चाने रहात होतो. परंतु, मला काहीच समजत नव्हते म्हणून दिनांक १५/१२/२०२५ रोजी पुन्हा माझ्या घरी परतले. त्यानंतर एक्सपीओ रजत शर्मा याने आम्हा इलाईट मेंबर्सना २८/०२/२०२६ रोजी पर्यंत सर्व गुंतवणूकदारांचे विड्रोवल येतील, असे आश्वासन दिले. त्यामुळे आम्ही देखील सर्व गुंतवणूक दारांना तसा संदेश पाठविला. त्यानंतर दिनांक २८/०२/२०२६ रोजी रात्री १०.०० वा. पर्यंत आम्ही विड्रोअलची वाट पाहत होतो, परंतु, पैसे काही आलेच नाही. त्यानंतर मार्च-२०२६ पासून ते सप्टेंबर-२०२६ पर्यंत एक्सपीओ चे रजत शर्मा, सुरेंद्र सैनी, सुरेंद्र बरवड, विजय मौर्या, ईश्वर वर्मा असे ईमेल द्वारे, झुम मिटींगद्वारे, व्हिडीओ कॉल द्वारे गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याचे काम जोरात चालू आहे, असे आश्वासन देत होते. परंतु, सप्टेंबर-२०२६ मध्ये एक्सपीओ ची वेबसाईट, अप्लीकेशन बंद झाल्याचे समजले, सदर अप्लीकेशन मध्ये असलेले यु.एस.डी.टी. डॉलर देखील शुन्य झाले. तेव्हा माझी खात्री झाली की, एक्सपीओ रजत शर्मा, सुरेंद्र सैनी, सुरेंद्र बरवड, विजय मौर्या, ईश्वर वर्मा यांनी आम्हा गुंतवणूकदारांची फसवणूक केली आहे. त्याच महिन्यामध्ये रजत शर्मा याच्या टिमने पॉकेट फॉलियो इनव्हेस्टमेंट प्लॅटफॉर्म नावाची कंपनी सुरू केली असून त्यामध्ये मला जॉईन करण्यासाठी वेगवेगळी प्रलोभने देत होते. आता सध्या पॉकेट फॉलियो इनव्हेस्टमेंट प्लॅटफॉर्म ही कंपनी जोमाने चालू आहे. त्यामध्ये एक्सपीओ चे पीडीत गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे.

मी दिनांक १७/०४/२०२४ रोजी माझ्या मार्फतीने एक्सपीओ कंपनीशी जोडल्या गेलेल्या गुंतवणूकदारांसाठी व्हॉटॲप ग्रुप तयार केला होता, त्यामध्ये आतापर्यंत एकूण ९२७ गुंतवणूकदार जोडले गेले आहेत. यामध्ये माझ्या मार्फतीने सुरुवातील २१ गुंतवणूकदारांनी गुंतवणूक केली होती, त्यानंतर त्यांच्या मार्फतीने आणखी गुंतवणूकदार जोडले गेले व त्यांच्या कडून पुढच्या काळात आणखी गुंतवणूकदार जोडले गेले होते. सदर एक्सपीओची साईट बंद झाल्यावर मी माझ्या टिम लिडरच्या व्हॉट्सॲप ग्रुपमधील सर्व लिडर्सना त्यांच्या गुंतवणूकदारांची माहिती देण्याबाबत सांगितले असता, त्यांनी आता पर्यंत त्यांच्या गुंतवणूकदारांची माहिती ग्रुपवर शेअर केली असता, त्यांची गुंतवणूक ही ११,९६,४८,५५७/- (अक्षरी अकरा करोड शहयाण्णव लाख अठ्ठेचाळी लाख पाचशे सत्तावन्न ) रू अशी प्राप्त झाली आहे. त्याच्या

स्कीन शॉटची प्रत सोबत जोडली आहे. सदर गुंतवणूकदार हे छत्तीसगढ, दिल्ली, चेन्नई, हैद्राबाद, मुंबई येथील राहणारे आहेत.

तसेच माझ्या संपर्कात असलेले तसेच ओळखीचे महाराष्ट्रातील एक्सपीओ चे अन्य इलाईट मेंबर्स नामे रामानंद साह मोनं- ९२६२३७२३३३ यांच्या मार्फतीने गुंतवणूकदारांनी अंदाजे ४०,००,०००/- (अक्षरी चाळीस करोड रूपये), अनिल पाटील मोनं.- ७२७६५१२९८५ यांच्या मार्फतीने गुंतवणूकदारांनी अंदाजे २५,००,०००/- (अक्षरी पंचवीस करोड रूपये), सुनिल पाटील मोनं-९९७०८०७५६८ यांच्या मार्फतीने गुंतवणूकदारांनी अंदाजे ५०,००,०००/- (अक्षरी पन्नास करोड रूपये), विशाल भामरे मोनं.- ८९९९४१०६३९ यांच्या मार्फतीने गुंतवणूकदारांनी अंदाजे ३०,००,०००/- (अक्षरी तीस करोड रूपये) असे एकूण एक्सपीओ कंपनीमध्ये १४५,००,००,०००/- (अक्षरी एकशे पंचेचाळीस करोड रूपये) गुंतविले असून त्यांची देखील फसवणूक झाली आहे.

तरी माहे जानेवारी-२०२३ पासून ते दिनांक १२/११/२०२५ रोजी पर्यंत रजत शर्मा, सुरेंद्र सैनी, सुरेंद्र बरवड, विजय मौर्या, ईश्वर वर्मा यांनी सदर XPO.ru ही रशियन कंपनी असून ती फॉरेक्समध्ये ट्रेडिंग करून दरमहा १० टक्के नफा मिळवून देते अशी बतावणी करून, तसेच ज्या गुंतवणूकदाराने १०,०००/- यु.एसडीटी डॉलर गुंतवणूक केल्यास त्यांना विदेशी ट्रिपला नेवून, तेथे आम्हाला गिफ्ट देवून आमचा विश्वास संपादन केले तसेच सदर कंपनीसाठी मी जमविलेल्या गुंतवणूकदारांकडून रोख रक्कमेच्या स्वरूपात त्याचबरोबर ऑनलाईन स्वरूपात पैसे घेवून तसेच त्यांच्या XPO.ru अप्लीकेशन मध्ये क्रिप्टो वॉलेट द्वारा यु.एस.डी.टी. डॉलर जमा करवून घेवून, असे एकूण अंदाजे ११,९६,४८,५५७/- रू रोख रक्कम आणि ऑनलाईन स्वरूपात घेवून आम्हाला नफा न देता, तसेच आमची गुंतविलेली मुददल रक्कम परत न करता विदेशात पळून गेले म्हणून माझी त्यांच्या विरोधात कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील जबाब हा संगणकावर मराठीत टंकलिखित केलेला असून तो मला वाचून हिंदीतून समजावून सांगितला असता, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(दिर्वेद्र काते)
सहाय्यक पोलीस निरीक्षक,
भायखळा पोलीस ठाणे, मुंबई

(ROHINI XALXO)
17/Nov/26
5:25 PM